Satara Historical Research Society

2

Historical Papers of the

# SINDHIAS OF GWALIOR

1777-1793

Price Rs 7/-

1940

सातारा इतिहास संशोधक मंडळाची

# ऐतिहासिक लेखमाला

# २

भाग १ महादजी सिंदे ले० १ – २५८

भाग २ पेशव्यांचा कारभार ले० २५९ – ४२४

संचयक— द बा डिस्कळकर, माजी क्यूरेटर, सातारा म्यु०,

संपादक— गो स सरदेसाई, रियासतकार, कामशेत

किंमत ४ रुपये

इ स १९४०

Printed by Mr S K Joshi LL B, at the "*City*" Press Satara Mangalwar Peth
and published by Mr V S Bakhle Secretary Satara Historical Research Society

Respectfully dedicated

to

**His Highness Maharaja**

**GEORGE JIVAJI RAO SCINDHIA**

**Bahadur, Maharaja of Gwalior,**

in appreciation of his intense
interest in our national
history

*By*

The Satara Historical Research Society

# FOREWORD

( Sir Jadunath Sarkar, Kt C I E, D Litt, Hony M R A S of Great Brittain, Hon Fellew, R A S of Bengal )

The Satara Historical Research Society has completed a very useful and important task by printing in this carefully edited and indexed volume the residue of Nana Fadnis's collection of historical papers ( known as the Menavali Daftar ), which has been purchased by the Bombay Government from the heirs of Rao Bahadur D B Parasnis It is a volume that no student of Maratha history can do without Many of the records here published for the first time, give invaluable information from contemporary sources, ranging from 1713 to 1802 and throwing new light on the careers of the great Peshwa Baji Rao I and his successors

The sober statesmanship of Raja Shahu finds another illustration in letter No 268 A few letters supply fresh details of Bhau's expedition to Panipat There are letters, hitherto unknown, from the Pashwa Madhavrao Ballal, elucidating his relations with Raghunathrao Quite a large number of papers is being published here for the first time, which desribe the delicacy of the situation of the Barabhais after the murder of Narayanrao No 375 contains a judicious remonstrance addressed to Nana Fadnis by his agent Baburao Krishna at Satara on the subject of Ram Raja being compelled to adopt a son Parasnis appears to have obtained copies of important papers of this class from the Satara Palace

But it is not Deccan history alone, or even principally, that this volume illuminates It contributes even more largely to the study of the career of the great Mahadji Sindhia, to whom 258 out of the 424 letters are devoted The two leading figures on the stage of Indian history in the last quarter of the eighteenth century – Mahadji Sindhia and Nana Fadnis – stand out in their contrasted personalities in this volume, no less markedly than in the mass of letters printed by H H the Maharajah Sindhia's Government under the editorship of Rao Bahadur G S Sardesai as " Historical Papers relating to Mahadji Sindhia, " from the same Menavali store

It is a good work well done, and ought to make its way in the world of scholarship by its undeniable intrinsic value

**Jadunath Sarkar.**

# प्रस्तावना

सातारा-इतिहास-संशोधक मंडळानें चालविलेल्या कामाचा हा दुसरा खंड आहे पहिला खंड सुमोर पांच वर्षां पूर्वी " सिंदेशाहीचीं राजकारणें " या नावानें प्रसिद्ध झाला सातारा म्यूझियम मध्यें ऐतिहासिक महत्त्वाचे कागद पूर्वी बाहेर न आलेले बरेच आहेत असें आढळून आल्या वरून ते छापण्याची व्यवस्था साताऱ्च्या मंडळानें स्वीकारली, तिचें प्रयोजन पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत सांगण्यांत आलें अ हे म्यूझियमचे क्युरेटर रा डिस्कळकर यांनीं कित्येक उपयुक्त कागद निवडून त्यांच्या नकला मजकडे पाठविल्या, त्या सर्व मीं वाचून इंग्रजी व इतर टीपा लिहून छापण्यासाठीं सातऱ्यास मंडळाचे सेक्रेटेरी रा बखले याजकडेस दिल्या ते हे कागद आतां वाच कांपुढें ठेवण्यास मला संतोष वाटतो

ज्या असल कागदावरून रा डिस्कळकरानीं या नकला केल्या, ते मला पाहण्यास मिळाले नाहींत त्यांनीं मला कळविलें कीं म्यूझियममध्यें कै पारसनीसांनीं मूळ कागदाच्या नकलाच ठेविल्या होत्या, त्यावरून त्यांनीं या दुसऱ्या नकला तयार केल्या अर्थात् नकलांत वाचनाचे वगैरे जे दोष मला आढळले त्यांतले सहज सुधारण्यासारखे दिसले ते मीं सुधारले, परंतु कांहीं तसेच राहू देणें भाग पडलें

या खंडांत एकंदर पत्रसंख्या ४२४ आहे, पैकीं सुमारें अडीचशें लेख महादजी सिंद्याच्या स्वाऱ्यांचे दिसले, तेवढे निराळे काढून ते या खंडाच्या पहिल्या भागांत छापले आहेत बाकीचीं पत्रें बहुतेक पेशवाईच्या सामान्य कारभाराचीं असून तीं या पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत दाखल केलीं आहेत तथापि ही व्यवस्था केवळ स्थूल मानाची असून विषय विभागणीच्या दृष्टीनें स्वीकारली आहे पेशवाई व्यवहाराचेही कांहीं कागद पहिल्या महादजी सिंद्याच्या भागांत दाखल झाल्याचें मागाहून आढळून आलें पहिल्या भागाचीं १८६ पृष्ठें असून त्यापुढें अखेरपर्यंत दुसरा भाग ठरविला आहे

दोनही भाग आपापल्यापरी अत्यंत महत्त्वाचे आहेत महादजी सिंद्याचा एकंदर पत्रव्यवहार प्रचंड असून तो या पूर्वी निरनिराळ्या ठिकाणीं प्रसिद्ध झालेला अभ्यासकांस माहीत आहे काव्येतिहास संग्रहाचा 'पत्रें यादी' खंड, समर्थभारत छापखान्यानें प्रसिद्ध केलेला 'ऐतिहासिक पत्रव्यवहार' नांवाचा खंड, दोन वर्षांपूर्वी ग्वाल्हेर दरबारानें बाहेर आणलेला पारसनीसाच्या पांच पुस्तकांचा मोठा खंड, शिवाय कोटेकर पंडिताच्या दप्तरांतले भाग वगैरे पुष्कळ ग्रंथांतून महादजीचे कागद छापलेले आहेत, पण त्यांत ज्या कित्येक उणीवा होत्या त्या बहुतेक या पुस्तकांतील कागदांनीं भरून येणाऱ्या आहेत यांतील बरींचशीं पत्रें नारो शिवदेव व सदाशिव दिनकर यांनीं लिहिलेलीं असून, त्याच लेखकांचीं पुष्कळ पत्रें वर सांगितल्याप्रमाणें पूर्वी प्रसिद्ध झालेलीं आहेत महादजीच्या मोठ्या स्वाऱ्या उत्तर हिंदकडे झाल्या, दक्षिणेंतील त्याचा उद्योग मुख्यत कोल्हापूर स्वारी, व तोतयावरील स्वारी, या सबंधाचा असून, त्याचीं भरपूर पत्रें या पुस्तकांत नवीनच प्रसिद्ध होत आहेत पैकीं बरींचशीं पत्रें धोंडो बहिरव नांवाचा नाना फडणिसाचा हस्तक महादजी बरोबर कोल्हापुरच्या स्वारींत होता, त्यानें लिहिलेलीं चमत्कृतिजनक वाटतील या लेखकाची भाषा गांवढळ व अंतस्थ कारभारांत त्यास प्रवेश नव्हता, सबब बाहेरच्या अवांतर गप्पा कंड्या इत्यादि जें काय लेखकाच्या कानावर पडलें, तें दिनचर्येच्या रूपानें त्यानें नानास कळविलेलें आढळतें भरपूर बातमी काढण्याची नानाची पद्धत या धोंडो बहिरवाच्या लेखांत व्यक्त होते अभ्यासकाच्या सोयीसाठीं महादजीच्या पत्रांचे पुढील चार पोटविभाग कल्पिले आहेत -

१ ले० १—७६ कोल्हापुर स्वारी,
२ ले० ७७—९३ तोतयावरील स्वारी,

३ ले० ९४—११७ पुण्यातील वाटाघाटी,
४ ले० ११८—२५८ गुजरात व माळवा

हा शेवटचा भाग उत्तरहिंदच्या व्यवहाराचा असून त्यातील कागदांच्या तारखा सर जदुनाथ सरकार यांनीं मुक्रर करून दिल्या

पत्राच्या शेवटीं जेथें × खूण असेल, तेथून पुढील अक्षरें निराळया वळणाचीं समजावीं

ले० २५९-४२४ चे कागद पुस्तकाच्या दुसऱ्या भागात स्वतंत्र कालक्रमानें छापलेले अत्यंत महत्त्वाचें आहेत इतक्या महत्त्वाचे हे कागद पारसनीसांनीं कोठून पैदा केले, ते त्यांनीच पूर्वी इतिहाससंग्रहात वगैरे का प्रसिद्ध केले नाहींत याचा पत्ता लागत नाहीं शाहूच्या आगमनापासून तों दुसऱ्या बाजीरावापर्यंतच्या नानाविध बाबतींचे हे कागद पूर्वी अज्ञात असलेली पुष्कळच नवीन माहिती देतात रघुनाथराव व नाना फडणीस यांच्या दरम्यान घडलेले व्यवहार, बापूराव कृष्णानें सातारा येथें छत्रपतींजवळ दाखविलेली दक्षता, चिमणाजी माधवरावाची अल्प कालीन कारकीर्द अशा किती तरी बाबती आपणास या कागदांत प्रथमच पहावयास मिळतात अभ्यासकास त्यांचें विशिष्ट महत्त्व कळावें म्हणून त्यांची एक सामान्य यादी प्रस्तावनेच्या पुढें स्वतंत्र दिली आहे ती अभ्यासकांनीं लक्षात आणावी अद्यापि आपणास इतिहास संशोधनात किती मजल गाठावयाची आहे, याची कल्पना या भागावरून झाल्याशिवाय राहणार नाहीं रा डिस्कळकरांनीं परिश्रमपूर्वक या नकला केल्या म्हणूनच हे कागद वाचकास उपलब्ध झाले

सातारा येथील सिटी प्रेस व ऐक्य प्रेस यांचे चालक रा स कृ जोशी यांचें पुस्तक छापून तयार करण्याचे कामीं हार्दिक व बहुमोल साह्य लाभलें, म्हणूनच तें प्रसिद्ध होऊं शकलें, हें नमूद करण्यास संतोष वाटतो त्यांनीं या बाबतींत केवळ सौदयाची दृष्टि न ठेवता काहीं तरी लोकोपयोगी कृत्य आपण करीत आहों अशा भावनेनें दोनही भाग सुंदर व आकर्षक स्वरूपात पुष्कळ घस सोसून कसे तयार केले हें आमच्याशिवाय बाहेरच्यास कळणार नाहीं एवढया शाब्दिक उल्लेखानें त्यांचे उपकार फिटणार नाहींत हें उघड आहे, तथापि ही त्यांची जनसेवा लोकांनीं मान्य करून घ्यावी एवढयाचसाठीं हा उल्लेख केला आहे

सातारा म्यूझिमचा उपक्रम तेथील जनतेस उपकारक झाला नाहीं, याजबद्दल कोणासही खेद वाटेल म्यूझियमच्या कामास दुजोरा यावा म्हणून तेथील ऐतिहासिक मंडळाची स्थापना झाली आणि त्या मंडळाच्या मार्फत बहुमोल कागदाचे दोन सुंदर खंड प्रसिद्ध झाले हें त्यास भूषणावह आहे तथापि आता म्यूझिम पुण्यास आल्यानें मंडळास स्थानिक काम उरलें नाहीं असें मानण्याचें कारण नाहीं सातारा जिल्ह्यात ऐतिहासिक साधनें मुबलक आहेत तीं जमवून प्रसिद्ध करणें जरूरीचें असून त्या कामीं इतउत्तर मंडळानें लक्ष घातल्यास पुढेंही इतिहासाची सेवा त्यास करिता येईल प्रस्तुत खंडाच्या संपादनाची संधि सातारकरांनीं मला दिली याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणि राहीन वाचक वर्ग या खंडास उदार आश्रय देऊन गुणग्राहकता व्यक्त करतील अशी आशा आहे

ऐतिहासिक साधनांचीं हीं पुस्तकें किती प्राप्तीचीं असतात हें वाचक जाणतातच थोड्यांदा अभ्यासकांच्या बाहेर त्यांचा खप बहुधा होत नाहीं फक्त पूर्वजांचें ऋण फेडण्याच्या दृष्टीनें त्यांचा खर्च सोसावा लागतो अशा स्थितींत सातारच्या मंडळानें श्रीमंत शिंदे सरकार अलिजाबहादर याजकडे साह्याची याचना केली ती मनावर घेऊन त्यांनीं उदार अंतःकरणानें ऐन वेळीं पैशाची मदत करून मंडळाचें आर्त हलकें केलें हा त्यांचा उपकार त्यांच्या स्वार्थत्यागी राष्ट्राभिमानास साजेसाच आहे त्यांचा सदैव उत्कर्ष होवो अशी सातारकर मंडळाची व व्यक्तिशः माझी ईशचरणीं प्रार्थना आहे मु कामशेत, ता १५ मार्च स १९४०

गो स सरदेसाई

# निवेदन

सातारा इतिहास संशोधन मंडळाच्या ऐतिहासिक लेखमालेचा हा द्वितीय भाग इतिहासप्रेमी जनतेस सादर करिताना मंडळ ऱ्या वतीनें थोडासा खुलासा करणे अप्रासंगिक होणार नाहीं लेखमालेचा पहिला भाग प्रसिद्ध होऊन तीन चार वर्षे झालीं या मुदतींत अनेक लोकांकडून व संस्थांकडून आमच्या संस्थेकडे विचारपूस करण्यात आली, आणि दुसरा भाग लवकर प्रसिद्ध व्हावा म्हणून सर्वत्र उत्सुकता दिसत होती, परंतु आमच्या मार्गांतील अडचणी मात्र सारख्या वाढत गेल्या, यास्तव हा भाग प्रसिद्ध करण्याचा योग अखेरीस आज आला हेंच आम्ही आपलें महद्भाग्य समजतों

साताऱ्यातील हिस्टॉरिकल म्यूझियम ज्या वेळीं खुलें झालें त्या वेळीं तेथें असलेले महत्त्वाचे कागदपत्र प्रसिद्ध करून ते जनतेस उपलब्ध करणें आपलें कर्तव्य आहे असे साताऱ्यातील कै दादासाहेब करंदीकर व कै रा ब काळे आदिकरून प्रमुख शहरवासीयांस वाटल्यामुळें प्रामुख्यानें या प्रसिद्धीच्या कार्याकरिता येथें आमच्या मंडळाची स्थापना झाली या मंडळाच्या विद्यमानें पहिला लेखमालेचा भागही त्वरित प्रसिद्ध झाला हिस्टॉरिकल म्यूझियमच्या ट्रस्टींनीं म्यूझियममधील कागदपत्र मंडळाला प्रसिद्धीस देण्याबद्दलही ठराव केला व या ठरावावर विसंबून जनतेकडून आर्थिक साहाय्याबद्दल आश्वासनें घेऊन आम्हीं दुसरा भाग छापण्यास घेण्याची तयारी केली परंतु यापुढें आमच्या मार्गांत अनेक विघ्नें उपस्थित झालीं मि ब्रहॅम व मि हमीदअली हे दोन सन्मान्य कलेक्टर सेवानिवृत्त झाल्यावर त्यांनीं जी म्युझियमची व आमच्या संस्थेची व्यवस्था कळकळीनें ठरवून दिली होती ती बंद पडली, म्हणूनच पुढें म्युझियमला अनिष्ट दशा प्राप्त होऊन तिचा संपर्क मंडळालाही पोंचला, आणि शेवटीं या उपयुक्त संस्थेचें साताऱ्यातून उच्चाटन झालें, याजबद्दल इतरांबरोबर मंडळालाही अत्यंत खेद वाटतो पण अशा खेदजनक प्रसंगात देखील आमच्या मंडळास निःसंशयपणें समाधान वाटतें तें एवढेंच, कीं इतिहाससेवेचें आपलें कर्तव्य यथायोग्य पार पाडण्यात आपणाकडून यत्किंचित् हयगय झाली नाहीं, उलट म्यूझियमचें कार्य यशस्वी करून दाखविण्यात मंडळानें शक्य तितके प्रयत्न केले सबब जे कांहीं बरे वाईट प्रकार होऊन गेले, त्याची शहानिशा करण्याची आता अवश्यकता नाहीं अनेकांच्या साह्यानें प्रस्तुतचा उपयुक्त कागदांचा हा खंड बाहेर आला ही गोष्ट मंडळाला चिरंतन अभिमानाची वाटेल, एवढें नमूद करणें जरूर आहे

ऐतिहासिक लेखमालेचे आमच्या मंडळामार्फत प्रसिद्ध झालेले दोनही भाग संपादण्याच्या कामीं रा ब गोविंद सखाराम सरदेसाई यांचें आम्हाला बहुमोल साहाय्य झालें आहे, इतकेंच नव्हे तर हीं पत्रें आम्हाला प्रसिद्धीस मिळण्याच्या कामींही त्यांचेच परिश्रम सर्वस्वी कारणीभूत झाले रा ब सरदेसाई यांची मदत व प्रोत्साहन नसतें तर हें अंगीकृत कार्य आम्हाला अर्धवटच सोडून देणें भाग पडलें असतें या पत्रांच्या संपादनाची जबाबदारी शिरावर घेऊन हीं पत्रें प्रसिद्ध होईपर्यंत त्यांनीं सदैव आम्हाला अनेक रीतींनीं साहाय्य व मार्गदर्शन केलें आहे, व त्याबद्दल आमच्या प्रमाणेंच महाराष्ट्रीय जनताही त्यांचे उपकार विसरणार नाही अशी आम्हाला खात्री आहे

हें निवेदन पुरें करण्यापूर्वी आमच्या मंडळामार्फत जे दोन भाग प्रसिद्ध झाले आहेत त्यांच्या खर्चाबद्दल जिल्ह्यांतील व जिल्ह्याबाहेरील ज्या धनिकांनीं व विद्वानांनीं आम्हाला आर्थिक साहाय्य

केलें त्याचे आभार मानणें आमचें कर्तव्य आहे पहिल्या भागाच्या प्रसिद्धीला इचलकरंजीचे अधिपति श्री बाबासाहेब घोरपडे व सिनामाऊचे श्री महाराज कुमार यानीं आर्थिक मदत करून आह्माला ऋणी केलें आहे हा दुसरा भाग जवळ जवळ छापून पुरा झाला तरीही आमची आर्थिक अडचण कायमच राहिली अशा वेळी ग्वालियर संस्थानचे तरुण व इतिहासप्रेमी अधिपति श्रीमंत जिवाजीराव शिंदे अलिजा बहादुर यानीं मोठ्या औदार्यानें हा पत्रसंग्रह प्रसिद्ध करण्यास आह्माला आर्थिक साहाय्य केलें नसतें तर हा ग्रंथ आज वाचकांना सादर करिता आला असता की नाहीं याबद्दल शंकाच आहे श्री महाराज सरकार यांचे त्यानीं दिलेल्या आर्थिक साहाय्या बद्दल आह्मी अत्यंत आभारी आहोंत

या ग्रंथाच्या प्रकाशनाबरोबर आमच्या मंडळाच्या कार्याचेंही अवसान होत आहे म्यूझियमच्या कार्याला पूरक ह्मणूनच आमच्या मंडळाची स्थापना झाली होती व म्यूझियमच येथून हलविल्यामुळें आता आमचें कार्यक्षेत्र बरेंच संकुचित झालें आहे सातारा जिल्ह्यात किती तरी महत्वाचे ऐतिहासिक अवशेष व कागदपत्र मिळण्यासारखे आहेत, पण हे कार्य स्वतंत्र रीतीनें पुढें चालविण्याचें आमच्या मंडळाला आता सामर्थ्य नाहीं आमचें मंडळ अस्तित्वात आल्यापासून ज्या ज्या लोकानीं आर्थिक मदत देऊन अगर सहानुभूति दाखवून आह्माला प्रोत्साहन दिलें त्या सर्वांचे पुन एकदा आभार मानणें आमचें कर्तव्य आहे

वि स बखले
वि र करंदीकर
चिटणीस, सातारा इतिहास संशोधन मंडळ

# महत्त्वाचा विषय निर्देश

एकाच कागदात अनेक विषय येत असल्यामुळें त्यांचें नक्की वर्गीकरण शक्य होत नाहीं तथापि या पुस्तकाचे दोन भाग स्पष्ट पडतात पहिल्या भागात महादजी सिंद्याच्या स्वाऱ्याचे कागद असून, दुसऱ्यात लेखांक २५९-४२४ चे कागद सामान्य पेशवाई कारभाराचे ऐतिहासिक दृष्टीनें विशेष महत्त्वाचे असून त्यात पूर्वी बाहेर न आलेली नवीन माहिती पुष्कळ आहे विशेषत पानिपतोत्तर कालीं रघुनाथरावाच्या खटपटी सुरू झाल्या त्यासबधात पेशवा माधवरावाचीं, नाना फडणिसाचीं वगैरे पत्रें या भागात छापलेलीं अत्यत महत्त्वाचीं आहेत भाषेच्या व राजकारणाच्या दृष्टीनेंही तीं अत्यत मोलवान वाटतील वाचकाच्या सोयीसाठीं त्याचा अल्प उल्लेख दाखवितों

१ पेशवा माधवराव— ले० ३११-३१३ व ३२१

२ नाना फडणीस—ले० ३२०, ३२१, ३२३, ३२९, ३३९, ३४१, ३७९, ३८२

३ रघुनाथराव—३५९-३६१, ३८९, ३९३-३९५, ३९८, ३९९, ४०४ ४०७

४ सखाराम बापू—ले० ८१, ८२, २६८, ३३५.

५ बाबूराव ( कृष्ण ) आपटे—ले० ३४५, ३७३ ३७५ ( उद्बोधक ) ३८२

६ महादजी सिंदे—ले० ३१, ६६, ९९

७ तोतया सबधीं—ले० १७, १८, १९, ९३

८ बाबूराव भास्कर ( मेहेंदळे ? )—ले० १४१, १९९-२०५, २१५, २१७ व २९३

९ पहिले बाजीराव –ले० २६२-२७०

१० गोविंदपत बुंदेले ले० २८७

११ नाना फडणिसाविरुद्ध कट—ले० २०, २२, २३, ७०, ३८२

१२ राजकारणी महत्त्व—ले०—१२३, १२९, १३५, १९१, २११, २२२, २३१, २३२, २६८ २८७, २९५, ३००, ३०६ ३२०, ३४९, ३८१, ३९३, ३९४

महादजी सिंदे व तुकोजी होळकर याचा बेबनाव पदोपदीं दिसून येतो यातच पुढें राज्य-नाश झाला

# दुरुस्ती

## १ पत्रांचें वर्गीकरण

पृ १ महादजी सिंदे, कोल्हापुर स्वारी

पृ ५५ महादजी सिंदे, -- पुणें

पृ ८३ ' पुण्यातील वाटाघाटी ' च्या ऐवजीं ' गुजरात-माळवा मोहीम ' हें नाव पाहिजे पुण्यातील वाटाघाटी हा विषय पृ ६५ वर येऊन गेला

## २ पत्रांचे लेखांक

पृ ५५-५६ वरील पत्राचे अंक १-५ चुकून पडले आहेत ते ७७-८१ समजावे

पृ १११ वर ले॰ 134 बद्दल 146 A वाचावें

## मजकुरांतील चुका

पृ २ इंग्रजी टीप व तारीख चुकली आहे The letter is addressed to Nana Fadnis, not to Sakharam Bapu, probably with reference to the latter's arrest on 27 February 1779 and the confiscation of his property

पृ १७ ओळ ४ " वस्त्रें " बद्दल ' पत्रें " वाचावें

,, इंग्रजी टीप शेवटचा शब्द plot वाचावा, place नव्हे

पृ ३१ ओळ ८ " सदाशिव दिनकर " बद्दल " सदाशिव मल्हार " वाचावें

पृ ४७ ओळ ४ " बाजीतजग " बद्दल ' जाबीतजग " पाहिजे

पृ १०० ओळ २३ " जान कुराण " बद्दल " नान कुराण " वाचावें

पृ १२५ पत्र न १७० इंग्रजी टीपेंत forging बद्दल foraging पाहिजे

पृ १६० पत्राचा न २१७, ५१७ नव्हे

पृ १६६ पहिली ओळ he शब्द कमी करावा

पृ १८५ टीप अजीमुद्दौला हा दौलताबादचा सुभेदार, मरहुन्मुल्क नव्हे मरहुन्मुल्कचा किताब अजीमुल्-उमरा

पृ १९५ इंग्रजी टीप पत्र २६८ ची The letter appears to be written to Mahadaji Ambaji Purandare at Poona by his cousin Malhar Tukdev from Satara

पृ २११ पत्र न २९१ वजारतमाब, वजारतमाहा नव्हे

पृ २१३ ओळ १६ मागेकईबद्दल मोगलाई वाचावें

पृ २१६ पत्र न २९६ ची ओळ ५ " सलाबत स्वादली आहे " असें वाचावें

पृ २५३ ओळ ३ " नाशिकापासून " बद्दल " नाशिकापासून " वाचावें

# अनुक्रमणिका

भाग १

१ ले १—७६ कोल्हापुर स्वारी,

२ ले ७७—९३ तोतयावरील स्वारी,

३ ले ९४—११७ पुण्यातील वाटाघाटी,

४ ले ११८—२५८ गुजरात व माळवा

भाग २

ले २५९—४२४ पेशवाईचा कारभार

# सूचि

## ( आकडे लेखांकाचे )


अंताजी नागनाथ- फत्तेसिंग गायकवाडाचा दिवाण- ७, २१
अनुपगीर गोसावी-२२५
अनूबाई इचलकरंजीकर-तोतयाशीं संबंध १८
अंबूजी इंगळे- १४५ ४८, १६०, १६६, १६८, १९९, १९९, २०० २४३
अमृतराव रघुनाथराव पेशवे- ४२४
अली बहादर- नानाकडून कानउघाडणी २५१, २५२
अहल्याबाई होळकर- नारो शिवदेवाची शिष्टाई १२०, माळव्यातील राजकारणाची स्पष्टता १३४, महादजीशी भेट १३६, तुकोजीबद्दल तक्रार १९१, १९५
आनंदराव धुळप—इंग्रजांशीं समुद्रावर चकमक २३१
आनंदराव पवार—१३१
आनंदराव रास्ते—३१३
आनंदीबाई निंबाळकर—३, १६
आनंदीबाई पेशवे—धारची लढाई व दुःस्थिति ३८९, ३९०, खुबीदार पत्र ३९३
आबा चिटणीस—२२७
आबाजी महादेव—३१५
आबाजी रघुनाथ—महादजींचा चिटणीस ७, ८, ९, २६, ३७, ६०
इंग्रज—माळव्यात युद्ध १२२, १२३, ग्वाल्हेर हस्तगत, १२४, १३५, माळव्यावर आक्रमण १४२, नाना फडणिसाची चढाई १४५, १४७, १४८, कुलारसची लढाई १६३, १७०, १७१, १८१, तहाची वाटाघाट १८२, नानाचा अविश्वास १८६, चेतसिंगासी बेबनाव १८८, महादजीशी तह १९६, २०३
इंद्रसेन—जागीर २०३, २२२-३
उधो वीरेश्वर चितळे, शिवनेरीचा किल्लेदार-३५८
कित्तूरकर देसाई—१
कृष्णराव काळे—३८७
कृष्णाजी पवार—१३१, १३३
केशव जगन्नाथ,—अशीरगडचा किल्लेदार-महादजीस किल्ला देण्यास हरकत १०४, १९८
केसोपंत दातार—पराजय १०२, १२२, १३७
कोल्हापूर छत्रपति—( स्वारींचे तपशील महादजी शिंद्याचे नावाखालीं पहा ) पेशव्यांशीं तह ७६.
खंडेराव त्र्यंबक ओढेकर—आनंदीबाईशीं लढाई धारेस ३८९, ३९१
खुमानसिंग बुंदेला—२०५, राज्याच्या खटपटी २९३
गंगाजी आव्हाड—२६, ६१
गंगाधर गोविंद खेर ( बुंदेले )—१३५, १६३, १८१, १८८, १९४
गंगाधर यशवंत चंद्रचूड—पेशव्याचा हुकूम ३१५
गंगाबाई पेशवे—मृत्यूचा अभिप्राय २०, ३४०, ३४४, ३५६ ५८, ३६३, प्रसूति व नामकरण ३६४-६६
गणेशपंत बेहेरे पेशव्याचा सरदार—१०२, १४५, १८५
गार्डर्ड— इंग्रज पहा
गिरमाजी मल्हार—१८२
गुमानसिंग बुंदेला—२०५, २९३
गुलराज वकील—पेशव्यास पत्र ३०१
गुलाम कादर—२२५
गोपाळशास्त्री—कोल्हापुरकराचा वकील २२
गोपाळ संभाजी – पिंपळोद्यावर नेमणूक १९३, नानाकडे भेलसे महालाच्या अव्यवस्थेची तक्रार २०६, २०९, २१०, २११, २१३, २१४, पुत्र धोंडो गोपाळ २५५, २५८
गोपिकाबाई—३१३
गोविंद कृष्ण—कमावीसदार ३०९
गोविंद गोपाळ, गायकवाडाचा दिवाण—१३०
गोविंद तमाजी—जैपुरास वकील २८७
गोविंद बल्लाळ बुंदेले – अंतरवेदींतील कामगिरी २८७, २८८
गोविंदराव गायकवाड—२१, १२८, १३०, तळेगावावर रघुनाथरावाचें पत्र ४०७

गोहदचा राणा ( छत्रसाल )— १६२, १६५, १७१, १८२, १८३, १८४, १९४, महादजीची चढाई २३४
घाशीराम—२९२
चवसिंग मोसले—नानास विनती ४२३, अमृतराव पेशव्यास विनती ४२४
चंद्रराव पवार—१०६, १०७, १०८
चिंतो विठ्ठल—दादाचा पक्षपाती २०, २२, ६५, ११४, कैदेंतून पलायन १२४-२७, चुलत्या पुतण्यात मध्यस्थी ३१५, ३२२, ३६०-६२, बायकोच्या वल्गना ४०६
चिमणाजी खंडेराव—महादजीचा वकील गोहदकराशी वाटाघाट १८२-८४
चिमणाजी माधव पेशवा—४१७-४२२
चेतसिंग—इंग्रजांशी बेबनाव १८८, १९०
जगतराज बुंदेला—मृत्यु २९३
जनकोजी शिंदे—पेशव्यांचें कर्ज वारण्याचा करार २९२, २९९.
जनार्दन गोपाळ—२५८
जयसिंग सवाई—बाजीरावावर लोभ २६२-६४, २६७, २७१
जाबितजंग धौशा रुक्नुद्दौला, निजामाचा सरदार—८, ९, ३१, ३४, ३६, ३७, ५४, ६६, ६७, ३८७
जिवबादादा बक्षी—६०
टिपू सुलतान— जनरल मॅथ्यूजचा पाडाव २२४, चढाई २३०, २४५, पुण्यास पैगंबराचा उत्सव ४१४
तुकोजी होळकर—शिंद्याच्या कामगिरीशी तुलना १, ३५, महादजीचा टोमणा ३६, ६६, ७३, मोरोबादादाच्या फितुराची उभारणी ७४, ७७-७८, ८५, पुणें दरबारकडे मागण्या १०४, ११८, नारो शिवदेवाची शिष्टाई १२०, माळव्यातील राजकारणाची स्पष्टता १३४, १४५, १८५, अहल्याबाई बद्दल तक्रार १९१, १९५, २४०, कपिलाषष्ठीची यात्रा २४९-५०, दिनचर्या, २५३, पुण्यात फितूर ४००
त्रिंबक नारायण, नारो शंकरचा पुत्र —५७, ४१६
त्रिंबकराव मामा पेठे—३५२, ३५३, मृत्यु ३५७
दादाजी गंगाधर होळकराचा कारभारी —११४
दिलीप सिंग, जयसिंगाचा चाकर—२८२
दुर्गाबाई, कोल्हापूर छत्रपतिची राणी—३७, ५१
देवराव हिंगणे—१३५
देवास—येथील पवार दोन पार्तीचा उगम १३१
धारराव शिंदे—६०, ६३
धोंडो गोपाळ, गोपाळ संभाजीचा पुत्र, पिंपळोद्याचा जाहागीरदार —२५४-२५५, २५८
धोंडो भीवराव, नानाचा हेर महादजी जवळ—८ व पुढची पुष्कळ पत्रें लिहिणारा
धौशा—जाबीत जंग पहा
नजफखान—११२, १२२, १२३, १३५, १३९, १४५, महादजीशी सधान १५८, १५९
नरसिंगराव कृष्ण— अमदाबादची बक्षीगिरी ४१५
नागोजी शिंदे— ३३०, ३४०, ३४१, ३४८, ३४९, ३५५—५७, ३६३—६५
नादीर शाहा— २६५, २६६, २६७, २७०
नाना फडणीवीस— तोतयाच्या प्रकरणातील खोचदार जबान्या १७-१९, कैद केल्याची अफवा २० व २२, गृहकृत्याचा अभिप्राय २०, स्वभावाची फोड २३, २८, तोतयाचे प्रकरणीं इंग्रजांची मध्यस्थी ८६, महादजीशी भेट ८७, पुण्यास अस्वस्थता ९०, तोतयाकडील धामधूम ९२, तोतयासंबधीं जबानी ९३, हेराकडून धोक्याची खबर ९९, १०१, महादजीची दिलसफाई १०५, दिल्लीची बातमी व चौकडीचें कारस्थान ११२, कोल्हापुरची तक्रार ११५, ११६, ११७ गुजराथची बातमी ११८, १२२, माळव्यातील युद्धाची वाटाघाट १२३, इंग्रजास ग्वाल्हेर हस्तगत १२४, चिंतो विठलाचें पलायन, फिरून अटक व कैद १२५-२७, राजकारणी पत्र १२९, देवासच्या दोन पार्तीचा उगम १३१, माळव्यातील राजकारणाची स्पष्टता १३४, कारभाराची अनास्था १३७, बुंदेलखंडची

व्यवस्था १४१, वसई इंग्रजांकडून हस्तगत १४४, इंग्रजावर उठाव १४५, इंग्रजावर अविश्वास १८६, चेतसिंगास मदत १९०, होळकराच्या तक्रारी १९१, बाबूराव भास्कराची लाघवी पत्रें १९९-२०२, गोपाळ सभाजीची तक्रार २०६, २०९-२११, पेशव्याच्या लग्नासाठीं बऱ्हाणपुरी कापड २१९, राज्यकारभाराचे मुख्य प्रश्न २२०, उत्तर हिंदुस्थानातील सुका मेवा २४७, अलीबहादरची कानउघाडणी २५१, पानपत स्वारींत बायको घेण्याचें कारण २९५, सुदर चित्राचा शोक ३००, ३०२, ३०४,[1] ६०५, माधवरावाचीं पत्रें ३०६, ३०७-८, ३१०, ३११- १३, राघोबादादावर देखरेख ठेवण्याचा हुकूम ३२१, माधवराव पेशव्याकडून शाबासकी ३२३ व ३२७, ३२९, ३३२, ३३९, ३४१, दादाची कर्नाटकात स्वारी, ३४२, ३४६, ३४८-४९, ३५०, ३५२-५४, ३६४, छत्रपतीकडून सूचना सावध राहण्याची ३८२, बाबूराव कृष्णास दयाची सूचना ३८३, ३८४, ३८८, ३९०, आनंदीबाईचे हाल ३९३, रघुनाथरावाची नरमाई ३९४ व ३९६, सखाराम हरीचा बदोबस्त ३९५, रघुनाथरावाची शरणागति ४०३-४०४, पुण्याची मडई ४१३, पैगबराचा उत्सव ४१४, बालपेशव्याचा बदोबस्त ४१६, चतसिंग भोसल्याची विनती ४२३

नारायणराव पेशवा, मातुश्रीस पत्र—३२४, ३२८

नारो कृष्ण दरवे, बऱ्हाणपुरचा सुभा—१६१

नारो गणेश, होळकराचा कारभारी—११४, १९५

नारोपत फाटक, नारायणरावाचा गवई—२९५

नारो शकर, सिंद्याचा वकील—७५, ७९, ८१

नारो शिवदेव—नानाचा वकील महादजीजवळ ४, ५, बधूचा मृत्यु ६, १२, १४, १५, २२, २६, ३२, ४९, ५६, ५९, ६०, ६२, मोरोबादादाचा फितूर ७४, फरवीरचा तह ७६, तोतयाचा पाठलाग ८३ व कबजा ८४, तोतयाचे प्रकरणात इंग्रजाचा हस्तक्षेप ८६, तोतयाचें पुण्यास आगमन ८७, पुण्यास अस्वस्थता ९०, १०४, महादजीची दिलसफाई १०५, गुजरातची स्वारी १०६, १०७-९, गुजरात युद्धाची बातमी ११३-१४, अहल्याबाईकडे शिष्टाई १२०, युद्धाची वाटाघाट १२३, १२४, १२५, राजकारणी पत्र १२९, देवास दोन पातींचा उगम १३१, १३२, माळव्यातील राजकारणाची स्पष्टता १३४, राज्यकारभाराची अनास्था १३७, इंग्रजाचें आक्रमण १४२, १४५, दक्षिणेस प्रयाण १५०, १५४, १५५, १७६, १८३, तहाची वाटाघाट नानास कळवितो १८४, १८५, २१२, राज्यकारभाराचे प्रश्न २२०

निजाम अलीखान—जकात माफ १७३

निजाम उल् मुल्क—बाजीरावाकडे तक्रार २६९, २७०, ३८७

परशुरामभाऊ पटवर्धन—१३२, १५६, ३८६

पाडुरंग रघुनाथ, नानाचा कारकून—१५७, १६०, १६३, १६६, १६७, १७०, १७५, १७८, १७९, १८१

पाराशर दादाजी, होळकराचा सरदार—१०६, १०७, १०८, १५६

प्रतापसिंग रावराजा माचेडीकर— २४३, २४४

फत्तेसिंग गायकवाड—१०८, १२८, १३०

बजाबा पुरदरे—२०, ३८२, पुण्यात फितूर ४००

बहिरोपत, होळकराचा कारकून—लबाडी १९५

बहिरजी ताकपीर, महादजीचा जावई—६७

बळवंतराव धोंडदेव—१३७ १४५, १४८, १५०, १६६, २१२

बाजी गोविंद, पेशव्याचा सरदार—९, १०

बाजीराव बर्वे, दादाचा साथीदार—४५

बाजीराव बल्लाळ पेशवा—व्यंकाजीरामाचें पत्र, दिल्लीचें कारस्थान २६२, २६४, नादीरशाहचें वर्तमान २६५-६७, शाहूची दिल्ली राजकारणाबद्दल सूचना २६८, २६९, २७०, भिल्लाचा बदोबस्त २७२, २७३, २७४, २७६, मस्तानीस पकडण्याचा कट २७५

बापूजी बल्लाळ फडके— पानिपत स्वारींतील बातमी २९६, २९७

बापूजी महादेव हिंगणे — मृत्यु २३७, ३१९
बापूजी रघुनाथ, सदाशिव दिनकराचा भाचा, नानाचा कारकून—१४८, १५४, १६४
बापूजी शामराज, कोल्हापूरचा वकील—३७, ३९, ४०, ५६, ५७, ६०, ६६, याचा भाऊ आपाजी श्यामजी ३८८
बाबाराव निजामाचा वकील—२५२
बाबूजी नाईक--गळाठ्यात २१, ३८७
बाबूराव कृष्ण आपटे, किल्ले बोधनचा फडणीस व साताराचा कारभारी —२९८, ३०५, ३१६, ३१७-३१८, ३२०, ३२९, ३३९, गंगाबाईचें पत्र ३४०, ३४४, खुबीदार वर्तन ३४५, ३४८-४९, ३५५, ३६३-६५, छत्रपतीची सूचना नानास ३८२, दग्याची सूचना ३८३, नाना फडणिसास अटक अटक करण्याचे हुकूम ४१७-४२२
बाबूराव कोन्हेर कोल्हटकर—झाशीच्या मामलतीचा करार २९४
बाबूराव नारायण, गोविंदपंत बुंदेल्याचा भाऊ-२९३
बाबूराव केशव, नानाचा हस्तक-१४३
बाबूराव भास्कर (मेहेंदळे?), पेशव्याचा कमावीसदार बुंदेलखंडात—१४१, लाघवी पत्रें २०२ व २०५, २०८, २१५, २१७, २२१, २४५
बाबूराव मल्हार बर्वे, दिल्लीस पेशव्याचा वकील २६५, २६८, २६९
बाबूराव वैद्य—होळकराकडे शिष्टाई १२०
बाळाजी गोविंद बुंदेले—१५४, १९९, २००, २२१, बुंदेलखंडावर शुर्जाची चढाई २३६
बाळाजी बाजीराव पेशवे—उत्तरेतून आरसे मागवितो २७७, छत्रपति रामराजाशी संबंध २८१, निजामाशीं किल्याची अदलाबदल २८२, २८६, २९०, जंजिरा हस्तगत करण्याचा प्रयत्न २९१, कर्ज वारण्याविषयीं शिंदे होळकराशी करार २९२, बुंदेलखंडातील परिस्थितीची फोड २९३, पानिपत स्वारींतील महत्वाचें वर्तमान २९६, २९८
बाळाजी विश्वनाथ—शाहूस पत्र २६०
बाळाबाई, महादजीची कन्या— शितोळ्याशीं लग्न ७, ९, ५६
बाळाराव गोविंद, महादजीचा कारभारी—३, ४, ७, ८, लग्न ९, १०, १६, २०, २२, २३, ३१, कोल्हापूर स्वारीतून परत ४०, लढाईत हल्ला ५६, ५९, ६०, ७५, ८६, ९९, आजार २०७
बाळोबा पागनीस शिंद्याचा सरदार—९८, १७०
भगीरथराव शिंदे—१०६, १०७, १०८
भवानराव प्रतिनिधि—अत्यवस्थ २१, ३५१, ३५२, ३५३, ३८२
भीवराव यशवंत पानसे—८३, ९०, ३९७
मनसूरशहा बीडकर फकीर, महादजीचा गुरु—२९, ६०
मयाराम वकील—२६९
मल्हारराव पवार, उदाजीचा नातू—६८
मल्हारराव होळकर—पेशव्याचें कर्ज वारण्याचा करार २९२
मस्तानी—महत्वाचा घाट २७५
महमदखान बंगष—२६६
महादजी शिंदे—होळकराच्या कामगिरीशी तुलना १, सासवडजवळ दगा २, ऋतुप्राप्तिचा समारंभ ४ व ९ व १०, त्वेषाची तक्रार ५, ८, ९, १०, ११, स्वभावाची फोड १४ व १५ व २२, उमेदीचें भाषण २६ व ३०, एकांत २७, गुरूचा रोष २९, हरिपंतास पत्र ३१, कोल्हापुरवर चढाई व सलुखाची सूत्रें ३४, लढाई ३६, कोल्हापुरावर चढाई व होळकराचा द्वेष ३७, लढाई ३९, ४१, ४४, लढाईची स्थिति ४५, तर्तूद ४६,-४८,-५२, कोल्हापुरची हलाखी ५८, कोल्हापुरचा वेढा ६३, ६५, खाजगी चर्चा नानाबद्दल ६९, ७३, दादासाहेबाकडे संधान ७५, करवीरचा तह ७६, हरिपंतास पत्र ८०, तोतयाचा पाठलाग ८३ व कबजा ८४, दादासाहेबाचा डाव ८५, तोतया पुण्यास ८७, पुण्यात एकांत ९५, ९७, ९८, पुणेदरबारकडे १०४, नानाकडून दिलसफाई १०५, गुजरात स्वारी १०६, ११८, माळव्यातील मोहीम १२२

ग्वाल्हेर इंग्रजास हस्तगत १२४, चिंतो विठलाचें पलायन १२५-२७, राजकारणी पत्र १२९, माळव्यातील राजकारणाची स्पष्टता १३४, अहल्याबाईची भेट १३६, कारभाराची अनास्था १३७, राणेखाना कडून कान उघाडणी १३८ व १४०, इंग्रजाचें आक्रमण १४२, मोहिमेची सूचना १४५, इंग्रजाना अटकाव १४७, इंग्रजाशी लढाई १५० व १५३, नजफखानाशी सधान १५८, १५९, कुलारस एथें इंग्रजाचा पराभव १६३ व १६६, निजामास जकातमाफ १७३, माळव्यातील दुर्दशा १७८, तहाची वाटाघाट १८२, चेतसिंगास मदत १९०, इंग्रजाशी तह १९६, ग्वाल्हेर काबीज २२७-२८, २३१, महादजींची अचूक निशाणबाजी २३८ जयपूरची खडणी वसूल २४४, दिनचर्या २५३

महादजी शिंदे तोरगळकर — याचा उपद्रव ३३

महादाजी बल्लाळ गुरुजी — महादजींची भेट ३, ४, ५, ७, ८, ९, १०, ११, १६, २३, २४, कोल्हापूर स्वारीतून परत ४०, ९५, नानाचा ध्यास ३०६

माधवराव गगाधर चद्रचूड--२२७

माधवराव नारायण पेशवे—पत्र ४०१, ४०२

माधवराव पेशवे थोरले— नानास पत्र ३०६ ८, ३११ १३, ३१४, ३१६ २० दादावर देखरेख ३२१, नानास शाबासकी ३२३, ३२७

मानाजी शिंदे — लढाईतून पळ २८, हैद्राकडून गौरव, बायको कैद ४१, ६१, ६९, पराभव १७४, १७९, १८५, याच्यावर नजर ४१६

मीरखान टोके, सरजामदार--बापाच्या पश्चात् सरजामप्राप्ति १३

मीर्झा जगली शहाजादा, शुजा उद्दौल्याचा पुत्र-२२५, पुण्यास मुक्काम २५६

मुरारराव घोरपडे—३५१

मोरो बापूजी फडके, हरिपताचा पुतण्या-१८,९३

मोरोबा दादा फडणीस — २०, २२, ७०, फितूर ७४, ९४, २९९, ३३०, ३३३, ३३४, कर्नाटक स्वारी ३३६-३७, ३४१, मुलाचा व्रतबंध ३४३, ३४७, ३४९, ३५८, ३६२, ३८२, ३८७ पुण्याचा फितूर ४००

मॅक्फर्सन्—पुण्यास भेट ८२

म्यूर् कर्नल् — इंग्रज पहा

यशवतराव पवार- २९२

येसाजी शिंदे, कोल्हापुरचा कारभारी - १, ३, ६, ७, ९, १०, सल्ला २४, लढाई ३६, ३७, ४५, ४९, ५१, ५९, ६२, ६६, ६८, तह ७६, ९५, १०००, १०१, नानाकडे तक्रार ११५-१७, कोल्हापुरचा तह १९७, पटवर्धनाशीं तह ३८८

रखमाबाई होळकर, तुकोजीची बायको—१९५

रघुनाथराव दादा पेशवे—७५, ७८, ७९, तोतयाच्या बडाव्याचा फायदा ८५, वास्तव्य २२९, प्रायश्चित्त २३२, गाविंदपत बुंदेल्याची कामगिरी २८७, २९०, ३०२, ३११, ३२३, कर्नाटकात स्वारी ३३१, ३३३, सखाराम बापूचा उपदेश ३३५, ३३६, ३४२, ३४५, ३४७, ३५२-५४, ३५६, सखाराम बापूस वळविण्याचा प्रयत्न ३५९-६१, ३८१, ३९२, ३९३, नरमाई ३९४, ३९६-९७, नाना फडणीस व बाल पेशवा यास कैदेचा घाट ३९८-९९, पुण्यास द्वाही ४००, शरणागति ४०३-४०४, ४०५, तळेगावावर स्वाधीन ४०७

रघुनाथ हरि नेवाळकर--२०२, २१५, २२१, बुंदेलखडावर शुजाची चढाई २३६,३२६

रघुजी आंग्रे—८६

रघुजी भोसले--२७०

रवळोजी शिंदे—साबाजीचा नातू २१८

राघोपत गुरुजी—१४६ अ

राणेखान भाई—३, ८, ९, २४, २६, २७, ३५, ३८, ४४, ६०, ८४, ८६, महादजींची कानउघाडणी १३८, १५०, १६७, १६८, १७५, २४१

रामचद्र गणेश कानडे पेशव्याचा सरदार—९,

कोल्हापुरच्या लढाईत ४५, ५५, ९५, १२९, १३७, मृत्यु १४४, ३३१
रामचद्र नाईक पराजपे – तोतयाची सुटका १९, ८९, ९२
रामचद्र नारायण गोरे—३२८, ३४३
रामराजा छत्रपति—नानास धोक्याची खबर देतो ९९, व ३८२, पेशव्याशी सबध २८१, ३१०, ३६६–६७
रायाजी पाटील—२६, ३४, ६०, १२५, २४४
रुक्नुद्दौला—जाबीतजग पहा
लालजी बल्लाळ गुळगुळे –१६६
वामनराव पटवर्धन—कर्नाटक स्वारी ३५०–५१, ३५२, ३८६
विसाजी आपाजी आठवले—१०६, ११३, ११४, १२२
विसाजी केशव लेले—वसईवर हरामखोरी १४४, ३६१
विष्णु महादेव, नानाचा हस्तक—२९०, ३७५
व्यकाजीराम वकील—२६२, २६४
शकराचार्य कोल्हापुरचे—पुण्यास आगमन ४१० ४१२
शहा आलम—१३५
शाहू छत्रपति (पहिल)—आशानदास मोकासा २५९, २६०, दिल्लीच्या राजकारणाबद्दल सुचना २६८, प्रमुख दरबारी व्यक्तींची यादी २८०
शाहू छत्रपति (दुसरे)—लग्न व खर्च ४०९
शिवराव हरि नेवाळकर—१६३, १८१, १९४
शिवाजी आपाजी पराजपे, रत्नागिरीचा किल्लेदार–तोतयाच्या सुटकेची जबानी १७–१९, बेड्या घातल्या ८८
शिवाजी विठल विंचूरकर—८, ३७, पुत्राचा मृत्यु १११, १३७, १४३, १६५, १४८, १५०, १६१, १९४
सखारामपत कोल्हापुरचा वकील पुण्यास—१००, १९७
सखाराम भगवत (बापू)—सामवडचे वाड्यात शिंद्याची जप्ती २, २०, २२, बायको आजारी ३४, पत्रें ८१–८२, ९९, ३०२, ३०३, माधवराव व दादासाहेब याची मध्यस्थी ३१५, ३३५, रघुनाथरावावर भक्ति ३३५, ३४१ ३४८–४९, ३५२–५४, ३५५–५७, दादासाहेबाकडील सदर्भ ३५९ ६१, ३८७, ३८८, आनदीबाईचें खोंचदार पत्र ३९० व ३९३, ३९६
सखाराम हरि गुप्ते— घनगडावर सक्त कैद–३९५
सखूबाई, जयापाची बायको — नातीचें लग्न ६
सगुणाबाई पेशवे—२८८
सटवोजा भोसले, कोल्हापुरचा सरदार– ३४, ३६, ३७, ६८, ३९, ४५, ४९, ५१, शकराचार्याचा मठ लुटला ५७, ६३, ६८, १३१, १८५
सदाशिव दिनकर, पेशव्याचा वकील मियाजवळ–१४, २२, २६, ३२, ९६, गुजरात युद्धाची बातमी ११९, दक्षिणेंत प्रयाण १५०, १८०, १८९, होळकराच्या तक्रारी १९१
सदाशिव पवार, देवासकर — १३१, १३३ हिशोबाची भानगड १४३
सदाशिव मल्हार, महादजीचा बक्षी—८, १४०, १४२, १४५, १४६, १४७, १६०, १६३, १६७, १६८, १८१, १९४, २३७
सदाशिव रघुनाथ केळकर, नानाचा वकील महादजीजवळ— ११, २३
सदाशिवराव भाऊ— नाना फडणिसास स्वारींत घेण्याचें कारण २९५
सर्वोत्तम बाबूराव अमात्य—नेमणूक ४२१
सुमेरसिग— लेकाचे हाल ४०६
साहेबज्वान टोके –२४१
हरकूबाई होळकर— नानास पत्र– १२१, १९५
हरिपत फडके— हैदरावर स्वारी ८, ९, स्वभावाची खोच २३, महादजींचें पत्र ३१, ९६, १४५, १५६, ३४९, ३५५, शकराचार्यांची भेट ४१२
हरि बाबाजी केतकर, शिंद्याचा सरदार— ५५, ६७, ६०, ६२, ६४, ९४, दादासाहेबास झाशीस नेतो ४०८
हैदरअली— १, ८, ९, मसलत २१, ३१, हरिपताशी लढाई ३९, करवीरकरास धीर ४५, ५९, ६६, ६७, ६८